नवी मुंबई महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400614.

-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-

दिनांक: 11/09/2017.

नवी मुंबई महानगरपालिकेची सप्टेंबर महिन्याची सर्वसाधारण सभा, मंगळवार, दिनांक 19 सप्टेंबर 2017 रोजी सकाळी 11.00 वाजता बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील राजमाता जिजाऊ सभागृह येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल:-

1. इतिवृत्त.

2. प्रश्नोत्तरे.

आयुक्तांकडील प्रस्ताव :

3. घणसोली विभाग कार्यक्षेत्रातील सिडकोकडून हस्तांतरित झालेल्या रस्त्यांवरील दिवाबत्तीची सुधारणा करणे.

4. नेरुळ विभागातील सेक्टर 9 येथील जलउदंचन केंद्रातील जुने पंप रुम तोडून नवीन पंप रुम बांधणे तसेच नवीन पंपीग मशिनरी बसविणे.

5. नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. 78, गौतमनगर येथे नवीन शाळा इमारत बांधणे.

6. नामकरणाच्या प्रस्तावाबाबत.

7. माध्यमिक शाळांमधील इयत्ता 9 वी व 10 वीतील विद्यार्थ्यांकरीता अन्नमित्र फांऊडेशन, मुंबई यांचेकडून मध्यान्ह भोजन पुरविणे.

8. केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन 2017-18 हरित क्षेत्र विकास (Green Space Development) अंतर्गत प्रस्ताव सादर करणे.

9. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची दैनंदिन साफसफाई व देखभाल करणे.

10. ऐरोली प्र.क्र.22 से.8ए मजुद्दीन शाळेसमोर पावसाळी गटर बांधणे.

11. नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत सी.बी.एस.ई. बोर्डाच्या शाळा सुरू करणे.

12. ऐरोली येथील यादवनगर येथे शाळेची नवीन इमारत बांधणे.

13. पामबीच मार्गावरील तुटलेले व गंजलेले खराब दिवाबत्ती बदलणे.

14. दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराकरीता जागा उपलब्ध करून देणेबाबतचे धोरण.

15. घणसोली सेक्टर-1 ते 7 व सेक्टर-9 येथे नागरी सुविधांची (रस्ते पावसाळी गटर व फुटपाथ) कामे करणे.

16. घणसोली सेक्टर-8 येथील नागरी सुविधांची (रस्ते, पावसाळी ड्रेन, जलवाहिनी, मलनि:स्सारण वाहिनी) एकात्मीक कामे करणे.

17. घणसोली सेक्टर-15 ते सेक्टर-22 पर्यंतच्या उर्वरित रस्त्याची सुधारणा करणे व बॉक्स कल्व्हर्ट बांधणे.

18. घणसोली से.15 येथील न.मुं.म.पा. बस डेपो जवळील रस्त्यालगत युटीलिटी डक्ट बांधणे व रस्त्याची सुधारण करणे.

19. घणसोली सेक्टर-21 येथील नागरी सुविधांची(रस्ते, पावसाळी ड्रेन, जलवाहिनी, मलनि:स्सारण वाहिनी) एकात्मीक कामे करणे.

20. घणसोली विभागातील रबाळे, गोठिवली गाव येथे मलवाहिन्या टाकणे तसेच गोठिवली येथे मलउदंचन केंद्र बांधणे.

21. वाशी से. 15 व 9 येथे वाशी कोपरखैरणे लिंक रोडवर (FOB) फुट ओव्हर ब्रिज बांधणे.

22. सायन-पनवेल महामार्गावरील नेरूळ उरणफाटा येथील चैनेज 125/770, एस.बी.आय.कॉलनी येथील चैनेज 126/900, एल.पी.जंक्शन येथील चैनेज 127/500 व चैनेज 127/600 येथील पादचारी भुयारी मार्गाची दुरूस्ती व सुधारणा करणे.

23. वाशी सेक्टर-30ए क्षेत्रातील रस्त्यांची डांबरीकरणाने सुधारणा करणे, आरसीसी युटीलिटी डक्ट बांधणे, क्रॉस पाईप युटीलिटी पाईप डक्ट बांधणे व फुटपाथची सुधारणा करणे.

24. नवी मुंबई महापालिका क्षेत्रात ॲम्फीबीअस बस प्रकल्प सुरू करणे.

25. बहुउद्देशीय इमारतीमधील जागा विविध प्रयोजनासाठी भाडेतत्वावर देणे.

26. नमुंमपा कार्यक्षेत्रातील सायन पनवेल महामार्गाची साफसफाई करणे. (वाशी टोलनाका ते सिबीडी बेलापूर हद्दपर्यंत)

ठरावाच्या सूचना :

27 व 28. श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-

(27) "नवी मुंबई महानगरपालिकेचे आस्थापनामध्ये काम करीत असलेले अधिकारी, कर्मचारी यांना हौसिंग लोन वाढविण्याबाबत तसेच हौसिंग लोनचे व्याजदर कमी करण्याबाबत त्याचबरोबर अधिकारी / कर्मचा-यांचा मेडीकल फॅसिलिटीच्या नियमावलीमध्ये बदल करणे. (28) "प्रभाग क्र. 12, सेक्टर-02 मधील एल.आय.जी. वसाहती अंतर्गत मलनि:स्सारण वाहिन्या व नविन पाण्याच्या वाहिन्या बदलून देणे.

29 ते 31. श्री. रामचंद्र बारशा घरत, यांजकडून :-

(29) "महापालिका शहरातील जुन्या बांधकामांच्या संरचनात्मक बांधणीच्या दर्जाची तपासणी करण्याची, तपासणी अहवालासाठी जी कार्यपध्दत अंगिकारते त्याच तत्वाने शहरातील रस्ते, पदपथ यांच्याखाली असलेल्या जुन्या पावसाळी नाली गटारांच्या संरचनात्मक बांधणीची तपासणी करण्याची उपाययोजना करणे. (30) "महापालिका अंदाजपत्रकात नमूद केलेल्या नागरी सेवा सुविधा विषयक प्रस्तावित कामांचे प्रस्ताव हे प्राधान्याने सहा महिन्यांच्या कालावधीत तयार करून त्या प्रस्तावित कामांना विहीत केलेल्या कालावधीत प्रशासकीय मान्यता मिळविण्याची कार्यपध्दत निश्चित करणे.

(31) "शहरातील बहूतांश प्रभागात ठिकठिकाणी पदपथांवरील गटारांची झाकणे, चौकटा तुटलेल्या तसेच नाली गटारांवरील संरक्षक कठडे, भिंती या ढासळलेल्या असल्याने नागरीकांना जिवितास धोका पत्करून चालावे लागत असल्याचे दिसून येत असूनही मनपा अधिकाऱ्यांकडून मात्र त्या धोकादायक समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याऐवजी वित्तिय अधिकाराच्या तांत्रिक मुद्यांचा आधार घेऊन त्या समस्यांसाठी प्रभाग समितीसमोर एकत्रित टेंडर प्रस्ताव सादर करण्याचे धोरण अवलंबविले जात असल्याने धोकादायक परिस्थिती प्रदीर्घ कालावधीसाठी तशी राहते. हे विचारार्थ घेऊन नागरीकांच्या जिविताच्या हितार्थ अशा समस्यांवर तातडीने उपाययोजना व समस्येचे निराकारण करण्याचे अधिकार व उत्तरदायीत्व हे क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्याची कार्यपध्दत सुरू करणे.

32 ते 34. श्रीम. संगिता संदिप म्हात्रे, यांजकडून :-

(32) "प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील संपूर्ण रस्त्यांचे डांबरीकरण करणे. (33) "प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील संपुर्ण गटारांची दुरावस्था झाल्याने हेवीड्युटी गटार बनविणे. (34) "प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील "चिकणेश्वर बस डेपो" मुख्य नामकरण प्रवेशद्वार बनविणे.

35 व 36. श्रीम. राधा सुरेश कुलकर्णी, यांजकडून :-

(35) "प्रभाग क्र. 73, इंदिरानगर, बोनसरी, तुर्भे MIDC परिसरातील प्लॉट नं. D/20/2 ABB प्रिंट ते BMW सर्व्हिस सेंटर, D 76/5 ते D 73/8 साईबाबा मशिन टूल्स, D 73/1 ते गुप्ता हॉटेल बोनसरी चुनाभट्टी, D 54 ते D/68 हेंकल कंपनी, D 73/3 ते साईकृपा हॉटेल चुनाभट्टी, D 89/2 ते D 72/2 च्या रस्ते व ड्रेनेजची दुरूस्ती करणे. (36) "प्रभाग क्र. 73, इंदिरानगर, बोनसरी, व तुर्भे MIDC अंतर्गत मोडणाऱ्या एव्हरेस्ट निवाराच्या समोरील माझदा डायकेन जवळील, चुनाभट्टी पसिरातील त्याचबरोबर रिकोंडा बानेसरी येथील नाल्यांच्या दोन्ही बाजूला संरक्षक भिंतीची आवश्यकता असल्याने ती बांधणे.

37. श्रीम. संगिता वसंत वास्के, यांजकडून :-

"प्रभाग क्र. 69, इंदिरानगर, गणपतीपाडा, वारलीपाडा व लगतच्या तुर्भे MIDC परिसरातील प्लॉट नं. C/334 ते C/320, प्लॉट नं. C/340 ते C/328, प्लॉट नं. C/358 ते C/496, प्लॉट नं. C/351 ते C/358, प्लॉट नं. C/368 ते वारलीपाडा वस्ती, प्लॉट नं. C/513 ते C/377, प्लॉट नं. C/515 ते वारलीपाडा नवीन वसाहत, वारलीपाडा ते प्लॉट नं. 496सी / डी.जे. एकस्पेटिंक च्या रस्ते व दोन्ही बाजूकडील ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणे.

38 ते 40. श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-

(38) "प्रभाग क्र.83,जुईनगर येथील प्रस्तावित असलेल्या चारही मार्केट व स्टॉलच्या भूखंडाचे सिडकोकडून पालिकेकडे लवकरात लवकर हस्तांतरण करून घ्यावे व नागरिकांसाठी सुसज्ज असे मार्केट बनविणे.

(39) "प्रभाग क्र. 83, जुईनगर अंतर्गत असलेल्या जल उचंदन केंद्रावर सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक नेमावेत त्याच प्रमाणे संरक्षक भिंतीची अद्ययावत दुरूस्ती करून मुख्य प्रवेशद्वाराची दुरूस्ती करावी व आतील परिसरात रस्ते व पथदिव्यांची पुरेशी सोय करणे. (40) "महानगरपालिकेत नवीन नोकर भरती करताना सर्वप्रथम स्थानिक भूमीपूत्रांच्या वारसांना नोकर भरतीत अग्रक्रम देऊन भूमीहीन झालेल्या भूमीपूत्रांच्या वारसांच्या बेकारीच्या समस्येवर उपाय योजना करणे.

41 ते 43. श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-

(41) "नवी मुंबई महानगरपालिकेला 25 वर्षे पुर्ण होत असताना आरोग्यविषयी नवी मुंबईतील गरीब जनतेकरीता उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उददेशाने, नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत प्रत्येक प्रभागात खाजगी हॉस्पीटल, नर्सिंग होम, क्लिनिक व प्रायव्हेट प्रॅक्टीसिंग डॉक्टर आहेत. नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून नवी मुंबईतील गरीब व गरजू नागरिकांकरीता प्रशासनाच्या माध्यमातुन खाजगी डॉक्टरांना एक विनंती पत्र काढुन प्रत्येक डॉक्टर यांना 15 दिवसांतून किंवा 30 दिवसांतून काही तास महानगरपालिकेच्या रुग्णालय किंवा अर्बन हेल्थ सेंटर मध्ये मोफत प्रॅक्टीस देण्याकरीता विनंती करण्यात यांवी, जेणेकरुन गरिब व गरजू नागरिकांना स्पेशलिस्ट डॉक्टर उपलब्ध होतील, जर का पत्राद्वारे डॉक्टर उपलब्ध नाही झाले तर प्रत्येक नवी मुंबईतील डॉक्टरांना बंधनकारक करण्यात यावे. याकरिता महापालिकेने प्रायव्हेट कॉर्डिनेटर पॅनल प्रत्येक प्रभागात स्थापन करुन प्रत्येक डॉक्टरांना वेळ व जागांविषयी नियोजन करणे. (42) "प्रभाग क्र. 64, वाशी अंतर्गत सर्व सोसायटी, असोसिएशन, प्लॉटस व रो-हाऊसेसककरीता ओला कचरा एकत्रित करण्यांकरीता कंपोजिट बास्केट (ओल्या कचरा साठविणेकरीता) महापालिकेच्या माध्यमातून देण्यांत यावेत, जेणेकरून आला कचरा लॅन्डफिल साईटवर न जाता प्रत्येक सोसायटी, असोसिएशन, प्लॉटस व रो-हाऊस स्वत: ओला कचरा त्या कंपोजिट बास्केटमध्ये जमा करून खत तयार करता येईल व महापालिकेच्या घनकचरा विभागाला हातभार लागेल व भार कमी होईल. जर का महापालिकेच्या माध्यमातून कंपोजिट बास्केट देण्यांत काही अडचणी असतील तर या कंपोजिट बास्केट माझ्या नगरसेवक / प्रभाग निधीतून देणे. (43) "नवी मुंबईतील ज्येष्ठ नागरिकांकरीता एन.एम.एम.टी.च्या माध्यमातून बसपास आय.डी.कार्ड दिले जातात व हे आय.डी.कार्ड दर तीन वर्षानंतर रिन्युवल करण्याकरीता पुन्हा जेष्ठ नागरिकांना रांगेत उभे राहून आपले पासपोर्ट फोटो व इतर कागदपत्रे जमा करायला लागतात व त्यानंतर त्यांना पुन्हा एन.एम.एम.टी. बस पास आय.डी.कार्ड देण्यांत येतो व या आय.डी. कार्डचा कालावधी फक्त 3 वर्षाकरीता असतो. महापालिकेच्या माध्यमातून ही पध्दत बदलून एकदाच लाईफटाईम जेष्ठ नागरिकांकरिता एन.एम.एम.टी. आय.डी.कार्ड देणे.

44. श्री. विनोद विनायक म्हात्रे, यांजकडून :-
"प्रभाग क्र. 110, करावेगाव मधील संपूर्ण स्ट्रिट लाईटस (दिवाबत्ती) तसेच हायमास्ट मध्ये सोडीयम व्हेपरचे दिवे असून त्यांचा प्रकाश अंधूक असतो वीज बिल सुध्दा जास्त प्रमाणात येते, आता नवीन प्रणालीनुसार एल. ई. टी. दिवे लावल्यास त्याचा प्रकाश चांगल्या प्रकारे असून जवळपास पन्नास टक्के वीज बचत होते. त्यामुळे प्रभागात संपूर्णपणे एल.ई.टी. दिवे लावणे.

45 ते 47. श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-
(45) "प्रभाग क्र. 55, खैरणेगांव येथे जय हिंद मेडिकल ते न.मुं.म.पा. उर्दू शाळेपर्यंत सिमेंट कॉक्रीटचा रस्ता करणे. (46) "प्रभाग क्र. 55, खैरणेगांव येथे विविध भागात जल वाहिन्या टाकणे. (47) "प्रभाग क्र. 55, सेक्टर 11, कोपरखैरणे येथील जॉगिंग ट्रॅकचे सुधारणा करणे.

48 ते 50. श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-
(48) "प्रभाग क्र. 51, मधील फाम सोसायटी, कांचन गंगा सोसायटी मागील वॉकींग बेल्टमधील बेंचेस, पेव्हर ब्लॉक व सरंक्षक ग्रीलची दुरावस्था झाली आहे तरी ते नव्याने बसविणे. (49) "प्रभाग क्र. 51, मधील से.12 मधील संपूर्ण प्रभागामधील गटारावील झाकणे नव्याने बसविणे. (50) "प्रभाग क्र. 51, मध्ये नागरीकांच्या सोईसाठी सर्वत्र दिशादर्शक फलक लावणे.

51. श्री. रविंद्र उध्दव इथापे, यांजकडून :-
"नवी मुंबई महानगरपालिकेच्या नेरूळ, बेलापूर, कोपरखैरणे, ऐरोली येथील रूग्णालयामधील रूग्णांसाठी वापरण्यात येणारे बेडशिट, पिलो कव्हर, तसेच अंगावरील चादर रोज बदली करणे आवश्यक आहे व रोज बदली केलेले बेडशीट, पिलो कव्हर अंगावरील कपडे धुणे आवश्यक आहे. त्याकरीता महानगरपालिकेच्या रूग्णालयामध्ये स्वतंत्र लॉन्ड्रीची व्यवस्था करणे.

52 ते 54. श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-
(52) "पावणेगांव येथील मुख्य रस्ता गांवदेवी मार्ग, अष्टविनायक मार्ग, शिवमंदिर मार्ग, श्रीगणेश मार्ग, स्मशानभूमी मार्ग या रस्तावर सुरक्षेसाठी महानगरपालिकेने सी.सी.कॅमेरा यंत्रणा लावणे. (53) "प्रभाग क्र. 48, येथील नागरी वस्ती पावणेगांव श्रमिकनगर येथील डेब्रिजसाठी घनकचरा सारखे एक भाग (स्पॉट) निश्चित करावे व त्यासाठी डेब्रिज टाकणारे व्यक्तीकडून शुल्क घ्यावे व सदर डेब्रिज उचलणेची व्यवस्था महानगरपालिकेने करावी. (54) "प्रभाग क्र. 48, येथील प्राथमिक शाळा पावणे / श्रमिकनगर स्मशानीभूमी पावणे / नागरी आरोग्य केंद्र पावणे, समाजमंदिर इमारती पावणे / श्रमिकनगर ग्रंथालय इमारत पावणे येथे सुरक्षेसाठी सी.सी.कॅमेरे यंत्रणा लावणे.

55 ते 57. श्रीम. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-
(55) "प्रभाग क्र. 47, कोपरखैरणे मधील कै. अण्णासाहेब पाटील उद्यान सुशोभिकरण करणे. (56) "प्रभाग क्र. 47, कोपरखैरणे मधील सिव्हरेज लाईन (मलनि:स्सारण वाहिन्या) बदलणे. (57) "प्रभाग क्र. 47, कोपरखैरणे मधील दिवाबत्ती योग्य त्या ठिकाणी बसविणे.

58 व 59. श्रीम.सीमा चिंतामण गायकवाड, यांजकडून :-
(58) "प्रभाग क्र. 31, समर्थनगर ते गांवदेवी व चिंचआळी ते म्हशेश्वरनगर तसेच घणसोली स्मशानभूमी ते घणसोली जेटी परिसरातील रस्ते, गटर, पदपथ, सिव्हरेज लाईन अशा बाबतच्या समस्या लवकरात लवकर सोडविणे. (59) "प्रभाग क्र. 31, घणसोली मध्ये सिडकोचे सामाजिक सुविधांसाठी राखीव ठेवलेले भूखंड लवकरात-लवकर हस्तांतरीत करणे.

60 ते 62. श्रीम. संगीता दिलीप बोऱ्हाडे, यांजकडून :-
(60) "प्रभाग क्र. 76, सानपाडा मधील से. 4 येथील मार्केट बांधणे. (61) "प्रभाग क्र. 76, सानपाडा मधील से.3 बधाई येथील चौकात हायमास्ट बसविणे. (62) "प्रभाग क्र. 76, सानपाडा मधील से.2 येथील मैदानात ओरिएंटल कॉलेजच्या बाजूने संरक्षक भिंत बांधणे.

63 ते 65. श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-
(63) "प्रभाग क्र. 01, ईश्वनगर येथे मन्नूभाईचाळ, उत्तर भारतीय चाळ व परिसरातील नागरिकांची अपुऱ्या शौचालया अभावी गैरसोय होत असून दुर्गामाता प्लाझा मागील जागेत 10 सिटचे कंटेनर शौचालय बसविणे. (64) "प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथे सदगुरूनगर परिसरातील नागरिकांची अपुऱ्या शौचालया अभावी गैरसोय होत असून सदगुरूनगर चाळ क्र. ई,एच व जे येथे 10 सिटचे कंटेनर शौचालय बसविणे. (65) "प्रभाग क्र. 01, ईश्वनगर येथील संपूर्ण प्रभागातील लाईट पोलवर एल.ई.डी.(LED) लाईट बसविणे.

66 ते 68. श्रीम. भारती मंगळ्या कोळी, यांजकडून :-
(66) "दिवाळे गावातील भूमीगत पाण्याच्या टाकीची क्षमता एक लाख लिटर एवढी आहे. गावाच्या लोकसंख्येनुसार सदर पाण्याच्या टाकीतील पाणीपुरवठा कमी पडत आहे म्हणून टाकीची क्षमता पाच लाख लिटरपर्यंत करणे. (67) "प्रभाग क्र. 105, दिवाळे गावातील संपूर्ण पथदिवे बदलून नव्याने LED फिटींग बसविणे. (68) "प्रभाग क्र. 105, दिवाळे येथील से.क्र. 19 येथील रस्त्याची सुधारणा करणे.

69 ते 71. श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-
(69) "मलनि:स्सारण पाणी प्रक्रिया केंद्रामधून प्रक्रिया झालेले पाणी प्रभाग क्र. 97 मधील सागर दर्शन टॉवर व सिब्रीज टॉवर येथील बगीचांसाठी व गाडी धुण्यासाठी उपलब्ध करून द्यावे. जेणेकरून पिण्याच्या पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होईल. (70) "प्रभाग क्र. 97, मधील गटारांची झाकणे तुटलेल्या अवस्थेत असून ती त्वरीत बदलणे. (71) "प्रभाग क्र. 97, सेक्टर-18, 18ए, 24 मधील रस्त्यांचे डांबरीकरण करणे.

72 व 73. श्रीम. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-
(72) "घणसोली विभागात सेक्टर 6 मध्ये महिला समक्षीकरण केंद्राचे काम पूर्ण झालेले आहे. त्यांचे लवकरात लवकर उद्घाटन करून समाजविकास विभागामार्फत महिला व बालकल्याण समिती व समाज कल्याण व झोपडपट्टीसुधार समितीमार्फत ज्या योजना आखल्या जातात. त्या या सक्षमीकरण केंद्रामध्ये सुरू करण्यात याव्यात. महिला बालके व युवक यासाठी येणाऱ्या योजना येथे राबविल्या जाव्यात. महिलासाठी व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते. शिवणकाम, ब्युटीशिन, कागदी कापडी पिशव्याचे प्रशिक्षण येथे यावर्षीपासूनच सुरू करण्यात याव्यात. योजना जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी जास्तीत जास्त जाहिरात करणे.

(73) "घणसोली विभागामध्ये नवी मुंबई महानगरपालिका व वन विभागातंर्गत असलेल्या गवळीदेव व सुलाईदेवी येथे काही सुविधांचा अभाव असल्याने गवळीदेव व सुलाईदेवी येथे अनैतिक प्रकार टाळण्यासाठी सुरक्षा रक्षक नेमण्यात यावेत व या दोन्ही देवस्थानासाठी मंदिरांना चौथरा बांधून विसावा शेड करण्यात यावे, डोंगराला संरक्षक कठडा बांधण्यात यावेत, दगडी पायऱ्या बांधण्यात याव्यात, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, पायवाट सुधारण्यात यावी, छोटे-छोटे पुल बांधण्यात यावेत, शौचालयाची व्यवस्था करण्यात यावी, कॅन्टींगची, अल्पोहाराची व्यवस्था करण्यात यावी, पार्किंग व्यवस्था करणे, दिशादर्शक फलक लावण्यात यावेत, पशुपक्षी व प्राण्यांच्या संरक्षणासाठी व तेथील रानभाज्या व रानमेवा यांच्या अस्तिवासाठी योग्यती उपाययोजना करण्यासाठी स्थापना करणे.

74 ते 76. श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-

(74) "प्रभाग क्र. 27, तळवली नाका घणसोली अंतर्गत अर्जुनवाडी येथे अंतर्गत रस्ताची डांबरीकरण करून सुधारणा करणे. (75) "प्रभाग क्र. 27, तळवली नाका घणसोली अंतर्गत सेक्टर-25 तळवली नाका येथे रस्त्याची डांबरीकरण करून सुधारणा करणे. (76) "प्रभाग क्र. 27, तळवली नाका घणसोली अंतर्गत अर्जुनवाडी, धोंडू पाटील चाळ, तळवली नाका येथे पदपथांची व गटारांची दुरूस्ती करून सुधारणा करणे.

77. श्रीम. उषा पुरूषोत्तम भोईर, यांजकडून :-

"प्रभाग क्र. 56, कोपरीगांव येथील हनुमानमंदिर ते कोपरी तलाव हा गावातील मुख्य रस्ता आहे. यावर्षी अतिवृष्टी झाल्यामुळे गावातील मुख्य व अनेक रस्त्यांना मोठे खड्डे आहेत. तसेच रस्त्यावरील डांबरी थर वाहून गेले आहे. गावातील अनेक घरांचा पाया (Plinth) रस्त्याच्या खालील गेले आहेत. कोपरी गावातील शाळेचा पाया (Plinth) देखील रस्त्याच्या स्तराप्रमाणे एक समान झाला आहे. पावसाळ्यात अनेक लोकांच्या घरात पाणी जात असते. सदर रस्त्यांची उंची न वाढवता रस्त्याचे (Asphalt Concrete) कॉक्रीटीकरण करणे.

78 ते 80. श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-

(78) "प्रभाग क्र. 95, से.20, नेरूळ गावातील श्री. विदूर हिराजी म्हात्रे यांच्या घरापासून ते श्री. दामोदर पांडूरंग म्हात्रे यांच्या घरापर्यंतच्या गावातील मुख्य रस्त्यावरील पायऱ्यांची अतिशय दयनीय अशी अवस्था आहे. त्या नव्याने बनविणे. (79) "प्रभाग क्र. 95, से.20, नेरूळ गावातील सर्व मुख्य रस्त्यांची सुधारणा करणे. (80) "प्रभाग क्र. 95, नेरूळ, से.20 येथील बांचोली मैदान ते कलश संकल्प टॉवर आणि तेथून पुढे नेरूळ तलावापर्यंत गटारांची दुरूस्ती करणे तसेच रस्त्यांचे वारंवार खोदकाम चालू असते. त्यामुळे तेथे डक्ट बनविणे.

81 ते 83. श्रीम. नेत्रा आशिष शिर्के, यांजकडून :-

(81) "प्रभाग क्र. 91 मध्ये असलेल्या रेणुकाचार्य उद्यानात दिव्यांग मुले व्यक्ती आणि त्यांचे पालक यांच्याकरिता एक विशिष्ट उद्यानाची निर्मिती करण्यात यावी. सदर उदयान नेरुळ परिक्षेत्राच्या अगदी मधोमध आहे आणि नवी मुंबईत अशा प्रकारे अदयाप उद्यान बनविण्यात आलेले नाही. तरी फक्त दिव्यांग मुले व्यक्ती आणि त्यांचे पालक यांच्यासाठीच नव्याने उदयान विकसित करणे. (82) "नवी मुंबई महानगरपालिका संचालित शाळांमध्ये इयत्ता 6 वी ते 10 वी या वर्गात शिकणा-या सर्व मुलींकरिता ज्याप्रमाणे त्यांना शाळा सुरु होत असताना त्यांना गणवेश, पुस्तके, रेनकोट इ. जे काही साहित्य पुरविण्यात येते, त्याच प्रमाणे त्यांच्या आरोग्याची काळजी घेणेही महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. म्हणूनच हया मुलींना वर्षाच्या सुरुवातीला बाकीच्या सर्व साहित्यांबरोबर त्यांना वर्षभर पुरतील एवढे सॅनिटरी नॅपकीन मोफत देणे. (83) "ठाणे-बेलापूर महामार्ग हा माझ्या वार्डला लागून असल्यामूळे पी.डब्लू.डी डिपार्टमेंटनी जेव्हा तीथे रस्त्याचे रुंदीकरण केले व सहा पदरी रस्ता बनविला त्यावेळेस नागरिकांना रस्ता ओलांडण्यासाठी काहीही सोय व उपाय योजना केलेली नाही. तेथे बनविलेला भुयारी मार्गही पूर्ण केलेला नाही व तो नादुरुस्त परिस्थीतीत आहे. त्या रस्त्याकडे जाण्यासाठी सर्व्हिस रोड ते मेन रोड कडे जाण्यासाठी मध्ये असलेल्या हायटेंशनच्या खालील रस्ता हा खराब झालेला आहे व खड्डे पडलेला आहे. त्यामूळे मेन रोड वर पोहचणे शक्य होत नाही. उरण फाटा ते स्टेट बँक कॉलनीच्या गेटपर्यंत हा जो पॅच आहे त्याला दुरुस्त व स्वच्छ करण्यात यावा. मेन रोड पर्यंत पोचण्यासाठी पायवाट करण्यात यावी व तेथे असलेले खड्डे बुजविणे.

84. वाशी सेक्टर 11 जुहूगांव येथील शिवसेना शाखा ते जुहूगांव शाळेपर्यंत रस्ता रुंदीकरणासाठी हेवी डयुटी गटार बांधणे व रस्ता डांबरीकरण करणे.

85. बेलापूर विभागातील दुर्गामातानगर येथे नवीन मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे.

86. नेरुळ से.20 रेल्वे स्टेशन समोरील रस्ता व पदपथांची सुधारणा करणे.

87. केंद्र शासनाच्या अमृत मिशन प्रकल्पांतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कोपरखैरणे व ऐरोली येथील मलप्रक्रिया केंद्रात प्रत्येकी 20 द.ल.लि. क्षमतेचे टर्शिअरी ट्रीटमेंट (Tertiary Treatmaent) प्लान्ट बांधणे, सर्वसमावेशक देखभाल दुरुस्ती करणे व चालविणे तसेच पुन:र्प्रक्रियायुक्त सांडपाणी टी.टी.सी औदयोगिक क्षेत्रातील (वाशी, कोपरखैरणे, ऐरोली) औदयोगिक संस्थाना पुरविणे.

88. ऐरोली, दिवानगर, से.15. भुखंड क्र. 22ए येथे "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर" स्मारकाची अंतर्गत सजावट करणे.

मा. महापौरांच्या आदेशावरून,
सही/-
(चित्रा बाविस्कर)
महानगरपालिका सचिव,
नवी मुंबई महानगरपालिका.

महापालिका सचिव कार्यालय,
नवी मुंबई महानगरपालिका,
दिनांक 11 सप्टेंबर 2017.